REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 3.8014(UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 4 | JANUARY – 2017



# महाराष्ट्रातील स्त्री चळवळ आणि महात्मा फुले : एक समाजशास्त्रीय विश्लेषण

डॉ. सौ. मीना गायकवाड
प्रमुख, समाजशास्त्र विभाग,
यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर,
ता.पन्हाळा, जि. सोलापूर.

**अबस्ट्रॅक -**

भारतात अस्पृश्याप्रमाणेच स्त्रियांनाही विकासापासून जाणिवपूर्वक वंचित ठेवण्यात आले. रुढी परंपरामुळे त्यांच्यावर अनेक प्रकारचे अन्याय अत्याचार होत आले. स्त्रियांनीही ते निमूटपणे सहन केले. परंतू महात्मा फुले यांनी त्यांच्यासाठी शिक्षणाचे दारे उघडे केली. त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचारापूर्वी विविध ग्रंथातून लेखन केले, चळवळी–लढे उभा केले. त्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. परिणामी स्त्रीया जागरुक झाल्या. अन्याय, अत्याचाराविरुध्द एकत्रित येऊन संघर्ष करु लागल्या. महात्मा फुले यांचे कार्य केवळ भारताच्याच नव्हेतर जगाच्या इतिहासात अत्यंत क्रांतीकारक ठरले. त्यांच्या या विचार कार्याचा मागोवा घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधात केलेला आहे. समाजशास्त्रीय व तुलनात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला आहे.

**प्रस्तावना –**

" क्रांतीचे चक्र अर्धेच फिरले आहे. आम्हासह चाक पूर्ण फिरल्याशिवाय खरी क्रांती होऊ शकत नाही, ते चक्र आम्हीच फिरवू... " असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात. स्त्रियांनी सामाजिक क्रांतीत, प्रत्यक्ष परिवर्तनात सहभाग केला नाही तर ती अपूर्ण व एकांगी राहील, हे सत्य महाराष्ट्रातील द्रष्ट्या विचारवंतानी अगोदरच साक्षात केलेले होते. कारण मनुनिर्मित, धर्माधिष्ठित समाजव्यवस्थेत भारतीय लोकसंख्येतील अर्ध्या भागाची भागीदार असलेली स्त्री–संख्या विषमतेच्या व पारतंत्र्याच्या बंदीत पिढ्यान्पिढया बंदिस्त होती. त्रस्त होती. अपमानित होती. दु:खी होती. तिच्या अपमानासाठी व दु:खासाठी न्याय नव्हता. स्वत:च्या शोषणातून निर्माण झालेले दु:ख धर्मशास्त्राच्या मंजूरीने उजागर झाल्यामुळे, हे शोषण आहे हे सुध्दा तिला म्हणता येत नव्हते., तर हे दु:ख नियतीमुळे आहे हे मानण्यात, दैव याला कारणीभूत आहे असे समजण्यातच आयुष्याची इतिकर्तव्यात आहे हे ती गृहीत धरु लागली.

परंतू या गल्लत धारणेच्या मुळाशी काही स्वार्थपरायण, लोभी धर्मशास्त्रज्ञ आहेत, ज्यांनी स्त्रीला तिचे हक्क समजू नयेत म्हणून तिच्या विद्याग्रहणाला प्रतिबंध घातला? या शब्दात महात्मा फुले यांनी स्पष्ट केलेले आहे. हे हक्क कोणते होते? हे मानवी हक्क होते, कारण हिंदू धर्मशास्त्राने स्त्रीला माणूस म्हणूनच नाकारले होते. मानवी मूलभूत हक्कांची उभारणी समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधूता

या तत्वांवर झालेली आहे. या तत्वांचा विचार करता आपण या तत्वांपासून कितीतरी दूर आहोत हे स्त्रियांना कळून चुकलेले आहे आणि म्हणून आपल्या मूलभूत हक्कांच्या प्राप्तीसाठी स्त्रियांनी स्त्रियांसाठी चळवळी चालवलेल्या आहेत. स्त्रियांच्या हक्क–लढाया संपूर्ण जगभर चालू आहेत. वर्णहीतेविरुध्द, जातिहीनतेविरुध्द, लिंगभेदामुळे होणाऱ्या शोषणाविरुध्द स्त्री–संघटना जागोजागी संघर्ष प्रवृत्तीने सज्ज झालेल्या आहेत. हा संघर्ष आहे समता प्राप्त करण्यासाठी, मानवी न्याय मागण्यासाठी, प्रतिष्ठा आणि सन्मान मिळवण्यासाठी, सुरक्षेसाठी, स्वातंत्र्यासाठी आणि सुखासाठी, राष्ट्रसंघाने १९७५ साल हे महिला वर्ष आणि १९८५ पर्यंत महिलादशक म्हणून घोषित केल्यानंतर विश्वातील सर्व देशांतील स्त्रियामध्ये नवचेतना निर्माण झाली आणि त्या आपल्या अस्तित्वाचा शोध घेऊ लागल्या.

भारत देशही अर्थातच याला अपवाद नव्हता. भारतातदेखील अशा प्रकारचा शोध घेण्याची प्रक्रिया सुरु झालीआणि भारतीय स्त्री इतर पाश्चात्य स्त्रियांपेक्षा अधिक शोषित, दु:खी व पीडित आहे, हे स्त्री–संघटनांच्या ध्यानात आले. या शोषणापासून, दु:खापासून तिला मुक्त करण्याची गरज आहे हे विचारात घेतले गेले. कारण हे शोषित द्विविध होते. धर्म, समाज, पुरुषप्रधान व्यवस्थेने केलेले आणि स्त्रीने स्वत:च शोषण दैवनिर्मित आहे अशी धारणा करुन घेऊन स्वत:ला त्या शोषणाचा विषय बनवले. सर्वात विलक्षण गोष्ट ही होती, की साहित्य, संस्कृती, धर्म, धार्मिक संस्था व प्रसारमाध्यमे हे शोषण उदात्तीकरणाच्या प्रक्रियेतून स्त्री–मनावर सारखी रुजवत होती. त्यामुळे शोषणातून निर्माण झालेल्या दु:खाचे समर्थन करण्याची प्रवृत्ती वाढून स्त्रिया मानसिक गुलामगिरीच्या बळी झाल्या. त्यांनी शारिरीक गुलामगिरी तर स्वीकारलीच होती. मानसिक गुलामगिरीतून, कोणत्याही माणसाची, मग ती स्त्री असो वा पुरुष, मुक्तता करणे महत्प्रयासाचे काम असते.

## भारतातील स्त्री मुक्ती –

' स्त्रीमुक्ती ' हा शब्द भारतीय जीवनात स्त्री–चळवळीकडून अशा प्रकारे प्रचारात आला, की अशा परकृत व स्वीकृत मानसिक व शारिरीक गुलामगिरीच्या बंधनातून स्त्रीला सोडवणे, तिची सुटका करणे म्हणजे स्त्रीमुक्ती होय. मुक्ती म्हणजे सुटका. शब्दच्छल करण्यासाठी काही पुरुषप्रधानतेला प्राधान्य देणारे विचारवंत ' मुक्ती ' शब्दाचा अर्थ स्वैराचार असा करतात आणि पुरुषी सतेच्या बांधील काही विदुषीही या अर्थाला साथ देतात. जनसामान्य स्त्रिया असे वागू लागल्या तर आश्चर्य वाटत नाही. परंतू तथाकथित बुध्दिवादी स्त्रिया जेव्हा आम्हाला स्त्रीमुक्तीची संकल्पनाच मान्य नाही, त्यामुळे कुटुंबे उध्वस्त होण्याचा धोका संभवतो असे म्हणू लागतात तेव्हा हसावे की रडावे हे कळत नाही. स्त्रीमुक्तीचा अर्थ एक तर त्यांना समजला नसावा किंवा समजलेला असूनही तो न मानण्याचा त्यांचा अट्टाहास असावा.

जेव्हा जाचक अन्यायकारक बंधनके पुरुषप्रधान संस्कृतीने लादून स्त्रीला आपणही माणूस आहोत हेच विसरायला लावले, अशा अन्यायकारक बंधनांचा डोळसपणे विचार करुन माणूस म्हणून आत्मभान देणे हे स्त्रीमुक्तीचे ध्येय होय, परंतू यात प्रज्ञेचा तोल कोठेही घसणार नाही आणि मानवी हक्क मागणारी स्त्री दुसऱ्याचे मानवी हक्क नाकारणार नाही हे अंतर्गृहितच आहे. पुरुषांवर ती उगाचच अन्याय करणार नाही. अर्थातच ते पुरुषदेखील मानवी मुल्ये मानणारे मार्ग स्वीकारील. स्त्रीमुक्तीचा हा अर्थ रुजवण्यासाठी सर्व स्त्री–चळवळी व्यापक झाल्या पाहिजेत. त्यातुन स्त्री–स्वार्थाचा व स्त्री–स्वैराचाराचा अर्थ काढता येऊ नये, अशा प्रकारे विचाराची बैठक व आचाराची प्रवृत्ती असावी. स्त्रीला प्रथम स्वत:विरुध्द संघर्ष करायचा आहे. स्वत:विषयीच्या कल्पना, स्वत:च्या धारणा, संस्कार, सवयी, विचार करण्याची पध्दत या सर्वांचा मानववादी मूल्यांतून, क्रांतिदर्शी बुध्दीने, जिला प्रज्ञा म्हणता येईल आणि सदसद्विवेकबुध्दीने विचार करुन आपल्या माणूसवादी अस्तित्वाला कोठेही बाधा येऊ नये यासाठी प्रयत्नशील असणे स्त्रीमुक्तीचे लक्ष्य आहे. अशा स्त्रीमुक्तीसाठी स्त्रियांच्या चळवळी कार्यप्रवण झालेल्या आहेत.

## म फुल्यांचे कार्य –

जगात सर्व स्त्रियांवरील जाचक, अन्यायकारक बंधनांच्या निर्मितीत धर्माचा मोठा वाटा आहे. सर्व धर्मसंस्थापक हे पुरुष होते. महात्मा फुले यांच्या मते, " काही धाडसी पुरुषांनी आपल्या जातीच्या स्वार्थासाठी बनावट, मतलबी धर्मपुस्तकात स्त्रियांविषयी आपमतलबी लेख लिहून ठेवले, किंवा या धर्मपुस्तकांच्या कर्तत्वात एक जरी स्त्रीचा सहभाग असता तर समाजव्यवस्थेचे चित्र उलट दिसले असते. या धर्मसंस्थापकांत बुध्द आणि ख्रिस्त या दोन धर्मप्रणेत्यांनी मात्र स्त्री–कैवाराची भूमिका घेतलेली होती. या भूमिकेला

करुणेचा आधार होता. ही मावववादापेक्षा भूतदयावादी, आध्यात्मिक करुणा होती. स्त्री–पुरुष समतावादी किंवा अन्यायनाशी अथवा मानवी स्वातंत्र्यूलक अशी इहवादी भूमिका नव्हती. या धर्मसंस्थापकांनी व्यक्तीचे दु:ख हे महत्वाचे सूत्र मानलेले होते. परंतू त्यात व्यक्तिसमूहाच्या शोषणातून किंवा व्यक्तीच्या शोषणातून निर्माण झालेल्या दु:खाचा अंतर्भाव नव्हता, तर नैसर्गिक दु:खालाच प्राधान्य होते. धर्मामुळे निर्माण झालेल्या रुढी, परंपरा, आचार व विचारपध्दती जनसमुहावर मोठया प्रमाणात प्रभाव करुन जातात. धर्माची मोहिनी बहुजनांवर असते, कारण बहुसंख्य समाज धर्मसंकल्पनेने झपाटलेला असतो आणि स्त्रिया तर धर्मभोळ्या व संस्कृतिरक्षक असतात. पुरुषांपेक्षा स्त्रिया या अधिक धर्मवेड्या असतात हे उघड सत्य आहे. जगात सर्वत्र हे धर्मवेडेपण प्रचलित आहे, म्हणून धर्मचिंतनाशिवाय स्त्रीमुक्ती चळवळीत पुढे जाता येत नाही. कारण धर्मप्रणित जाचक रुढी–परंपरा तोडणाऱ्या स्त्रियांच्या शत्रू स्त्रियाच असतात! त्या सर्व प्रकारच्या अन्यायकारक बंधनांना व जुलमी परिस्थितीला धर्माच्या भीतीमुळे व दैववादामुळे निरपाय होऊन शरण जातात. कारण त्या मनाने दुबळ्या असतात व बुध्दीने विचार करण्याची सवय धर्माने हजारो वर्षापासून घालवलेली आहे. अनेकदा, विचार करण्याचे बळ येऊनही रुढींच्या बंधनांना घालवण्याचे सामर्थ्य स्त्रियांत येत नाही. हे गेल्या वीस वर्षाच्या चळवळीत काम करतांना अनुभवास आले.

स्त्रीमुक्तीचा उपरोक्त संदर्भ लक्षात घेता, महाराष्ट्रामध्ये स्त्रियांच्या चळवळी संपूर्ण भारतात आघाडीवर आहेत. कारण महाराष्ट्रात स्त्री–मुक्तीवादी विचारसरणीचा उदय दीडशे वर्षापूर्वीच झालेला होता. समता, स्वातंत्र्य बंधुता व न्याय या चार तत्वांच्या अनुषंगाने येथील धर्माची व समाजव्यवस्थेची चिकित्सा विश्लेषणात्मक पध्दतीने महाराष्ट्रीय विचारवंत करु लागलेले हाते. म. फुल्यांनी स्त्रीयासाठी काढलेली भिडे वाडयातील पहिली शाळा बालहत्या प्रतिबंध गृह स्त्री शिक्षिका म्हणून सावित्रीबाईंना तयार केले हया कार्याचा परिषद या चळवळीतून दिसते. या अन्याय्य विषमतेविरुध्द लेखनाद्वारे अभिव्यक्ती भीत भीत तुरळकपणे होत असतांना संपूर्ण लेखन, भाषण आणि प्रत्यक्ष कृती या त्रिविध सामर्थ्यानिशी चालत आलेला हा बंडखोर ' जोतिराव फुले ' नामे पहिला होता. ज्याच्या क्रियाशील प्रहारामुळे येथील व्यवस्थेला तडे गेले आणि दीडशे वर्षानंतरचा महाराष्ट्र भारतात तर आघाडीवर आहेच, परंतू परोगामी स्त्रियांच्या व दलितांच्या चळवळींमध्ये विश्वाच्या नोंदबुकात नोंदला गेलेला आहे. हे संपूर्ण श्रेय महात्मा जोतिराव फुले व त्यांना सक्रिय साथ देणाऱ्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे आहे. जोतिराव फुले नावाच्या वादळाने येथील ढोंगी व असत्याभिन्वेषी धर्मसत्तेला आपल्या घणाघाती आघातांनी जर्जर केलेले दिसते. या पाखंडी अन्याय्य धर्मसत्तेच्या विरुध्द बंडाचे निशाण घेऊन निघालेल्या महात्मा फुले दांपत्यांची नोंद महाराष्ट्रातील ' स्त्री मुक्तीचे जनक ' म्हणून करावी लागेल आणि या युगाला फुलेयुग हेच नांव द्यावे लागेल. कारण बोलक्या सुधारकांनी चळवळीला विचारांचे बळ मिळत असले तरीही क्रियेशिवाय विचार पोरके ठरतात. चळवळीला गतिमानता लागते. प्रत्यक्ष हालचाली लागतात व काम लागते. लेखन, भाषण हे त्या चळवळींचे काही अंश असतात. परंतू चळवळ ही प्रत्यक्ष कार्याची फुटपट्टी घेऊनच मोजावी लागते.

महाराष्ट्रातील आजच्या स्त्रियांच्या चळवळी स्त्री–मुक्तीच्या असून महात्मा फुले यांनी दर्शवलेल्या दिशेने झेपावत आहेत. महात्मा फुले यांनी स्त्रियांना केवळ दयेचा विषय न समजता, केवळ अनुषंगिक सुधारणांनी स्त्री–जगताची डागडुजी केली नाही., तर मूलग्राही पध्दतीने विचार करुन स्त्री–पुरुष समतेवर आधारलेल्या स्त्री–स्वातंत्र्याचा उच्चार केला. स्त्री–पुरुष या दोन्ही समान महत्वाच्या मानवी घटकांची तुलना करुन हिंदू धर्मनिष्ठ समाजव्यवस्थेने स्त्रियांवर किती अन्याय केला हे सप्रमाण आपल्या सार्वजनिक सत्यधर्म पुस्तकात दर्शवून दोघांना समान लेखलेले आहे. सत्यवर्तन करणारे कोणास म्हणावे या प्रश्नाला उत्तर देताना जोतिराव म्हणतात, " आपल्या सर्वांच्या निर्माणकर्त्याने एकंदर सर्व प्रणिमात्रांस उत्पन्न केले. त्यापैकी स्त्री–पुरुष हे उभयता जन्मत: स्वातंत्र व सर्व अधिकारांचा उपभोग घेण्यास पात्र केले आहेत, असे कबूल करणारे त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावेत, सध्या महाराष्ट्रात चालू असलेल्या स्त्री–मुक्ती चळवळीचे समग्र सारच प्रस्तुत वाक्यात जोतिरावांनी अभिव्यक्त केलेले आहे. या जन्मसिध्द समतेसाठी, स्वातंत्र्यासाठी आणि समान अधिकार भोगण्याच्या मागणीसाठी आजही स्त्रियांच्या अनेक संघटना चळवळींच्या माध्यमातून कामे करताना दिसतात. महात्मा जोतिरावांनी स्वत: अनेक चळवळी चालवलेल्या आहेत, ज्यांची इतिहासाने दखल घेतलेली आहे. त्यांनी हाती घेतलेल्या चळवळी सर्वार्थाने सफल झाल्यात काय? त्याची आजही गरज आहे का व कशी ? बदलत्या समाजात स्त्रियांनी किती प्रश्न व समस्या चळवळींच्या रुपात हाताळल्या, त्यांची फलश्रुती काय? अशा प्रकारे सध्या महाराष्ट्रात अस्तित्वात असलेल्या स्त्रियांच्या विविध चळवळींचा चिकित्सा पध्दतीने विचार करण्याच्या आवश्यकतेवर भर दिला गेला पाहिजे.

सामाजिक परिवर्तनासाठी स्त्रियांच्या क्रियाशील सहभागाची गरज आहेच. कारण फुलेवादी-स्त्री-मुक्तीवादी समतेच्या दृष्टीने अभाव सर्वच कुटुंबात व समाजात स्त्रियांना ठायी ठायी जाणवतो. कुटुंबासाठी कष्ट, झीज, त्याग करुनही तिचे कर्तृत्व शून्यच ठरते. तिला फक्त उपहास, जीवघेणी व्यथा सोसावी लागते. उपेक्षा व अपमान याशिवाय तिच्या वाट्याला काहीही येत नाही, हे सत्य लक्षात घेऊन विविध क्षेत्रांत स्त्रियांच्या हालचाली सुरु झालेल्या आहेत. स्त्रियांचे अनेक प्रश्न घेऊनआंदोलने उभी राहतात. आपल्या समस्या घेऊन स्त्रिया रस्त्यावर येत आहेत. सुरुवातीला या आंदोलनात शहरी स्त्रियांचाच सहभाग दिसून येत असे. पण आता, या चळवळी ग्रामीण भागातही जाऊन पोचलेल्या आहेत. अलिकडे, १९८५ नंतरच्या काळात गावागावातील स्त्री-परिषदांना ग्रामीण स्त्रियांची उपस्थिती बघताना एक म्हणावेसे वाटते, की गावागावात राजकारण चुलीपर्यंत पोचलेले आहे. जेव्हा समाजकारण चुलीपर्यंत पोचेल तेव्हा खऱ्या अर्थाने भारतीय समाज परिवर्तनास सज्ज झाला असे समजता येईल. चुलीपर्यंत याचा अर्थ कुटुंबाच्या कुटुंबाच्या मुळाशी असलेली स्त्री आत्मभानाने विचार करु लागेल तेव्हा, आजचे वास्तव निश्चित वेगळे असेल आणि कालान्वेषी परिवर्तन वास्तवात आणण्यासाठी स्त्रियांच्या चळवळी जोमाने काम करु लागलेल्या आहेत. ग्रामीण, शहरी पातळीवरील स्त्री-संघटना, शासनप्रेरित महिला आयोग, समित्या, कल्याणकारी मंडळे व कार्यक्रम इत्यादींद्वारे दहा वर्षापूर्वी विशिष्ट कोशात राहणारी ही स्त्री सहजपणे कुटुंबाच्या कोशातून बाहेर पडून समाजभिमुख बनली.

### म. फुल्याच्या कार्याचे फलीत -

महात्मा फुले यांच्या कार्यशैलीप्रमाणे स्त्री-चळवळींनी कार्यशैली अंगिकारलेली आहे. महात्मा फुले यांची कार्यशैली द्विविध आहे. १.रचनात्मक क्रियाशीलता, २. आक्रमक क्रियाशीलता. रचनात्मक क्रियाशीलतेचा मूलभूत आधार आहे ज्ञान. यास शिक्षण, प्रशिक्षण, जाणीवजागृती, दु:खी-पीडितांसाठी आधार आहे. रोजगार-उपजीविकेच्या सोयी, त्यात येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी पाळणाघरांसारखी, शिशुसंगोपनासारखी, स्त्रियांच्या आरोग्याविषयी अशा अनेक रचनात्मक कार्यक्रमांची बांधणी करुन स्त्रियांना सुरक्षित वाटेल अशा प्रकारच्या एकूणच कामाची आखणी यांचा रचनात्मक कार्यशैलीत समावेश होतो. यात रचनात्मक किंवा विधायक भाषणे व लेखनाचा देखील समावेश करता येईल. एकूण रचनात्मक कार्याचा उद्देश पीडितांचे दु:खविमोचन व पुढचे जीवन जगण्यासाठी आत्मविश्वास निर्माण करणे होय.

आक्रमक क्रियाशीलतेत आपल्यावर विषमतावादी अन्याय करणारा धर्म, समाज, शासनसंस्था, धर्मसाहित्य, प्रसारमाध्यमे, ललित-वैचारिक साहित्य इत्यांदींविरुध्द आक्रमक रीतीने लढण्यासाठी रस्त्यावर येऊन आंदोलने, निदर्शने, मोर्चेबांधणी करणे, त्याशिवाय सभा-परिषदांतून त्याबद्दल परखड समाचार घेणे व लेखनाद्वारे अश्लाघ्य, अन्याय्य वर्तनावर झोड उठवणे, अन्याय सहन न करण्याची प्रवृत्ती ही अधिकाधिक वाढेल या हेतूने स्त्रियांना निर्भय करुन त्यांच्यावरील अन्यायाविरुध्द खुल्या रितीने उच्चार करायला लावणे यासाठी आक्रमक कार्यशैली जास्त उपयोगी असल्याचे दिसून येते, कारण रचनात्मक रीतीने पोटाचे व मन:शांतीचे प्रश्न सुटतील, परंतू अन्यायामुळे होणारे बुध्दी व मन अस्वस्थ करणारे प्रश्न सुटणार नाहीत.

स्त्रियांना त्यांचे मानवी हक्क समजण्यासाठी शिक्षण दिले पाहिजे. म्हणून फुले यांनी दलित मुलींसाठी १८४८ मध्ये शाळा काढली आणि १८५१ साली उच्चवर्णीय मुलींसाठी शाळा काढली. या काळात स्त्रियांचे शिक्षणाचे प्रमाण शून्यावर होते. स्त्री-शिक्षणाचा प्रारंभ जोतिरावांनी केला. यापुढे वि. रा. शिंदे, अण्णासाहेब कर्वे, भाऊराव पाटील इत्यादी कर्मवीरांच्या प्रयत्नांनी स्त्री शिक्षणाच्या चळवळीला वेग आला. स्वातंत्र्यानंतर शासनाने सक्तीयोजना करुनही स्त्री-शिक्षणाचे प्रमाण किती वाढले हे स्त्री-चळवळींनी या शिक्षणाचा अभ्यास केला असता, १९८१ च्या जनगणनेनुसार स्त्रियांच्या साक्षरतेचे शहरी प्रमाण २४.८२ टक्के असून ग्रामीण पातळीवर १७.९६ टक्के आहे. अर्थातच हे संख्यात्मक आहे. गुणात्मक शिक्षणाचे चित्रण करु लागलो तर निराशा पदरी येते. तेच ते, धर्मश्रध्द, देवभोळेपणा, अंधश्रध्दा, विज्ञानरहित विषमतावादी शिक्षण गतानुगतिकपणे दिले जाते. ज्यामुळे येथील विज्ञानपारंगत व्यक्तीदेखील बुवाबाजीला, बाबागिरीला, धर्मप्रदर्शन करणाऱ्या उत्सवगिरीला मान्यता देतात. आणि म्हणून स्त्री-चळवळींना गुणात्मक, तर्कनिष्ठ, विज्ञानवादी दृष्टिकोन घेऊन शिक्षणाला अग्रक्रम दिलेला आहे. अंधश्रध्देचा, अंधश्रध्दा निर्मूलाचा कार्यक्रम देखील या शिक्षणाचा भाग बनलेला आहे. या कार्यक्रमाचे प्रदर्शन शाळा महाविद्यालयातून जसे केले जाते, तसेच ग्रामीण व शहरी झोपडपट्टीतील अशिक्षित, अंधश्रध्दा स्त्रियांसाठी देखील सभा, संमेलने, प्रदर्शनातून व परिषदांतून या कार्यक्रमांचे आयोजन केले

जाते. धार्मिक अंधश्रध्दा, जातिभेद, स्त्रियांच्या अशौचाबद्दलचे समज व अपसमज इत्यादींबद्दल आक्रमक व विधायक रीतीने, प्रात्यक्षिके दाखवून विश्लेषण केले जाते.

महात्मा फुले ज्योतिष, धार्मिक ढांगबाजीविरुध्द टीकेची झोड उठवत असून (सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक, पृष्ठ ४१८), या स्त्रियांना वेगवेगळया व्यवसायाचे प्रशिक्षण, रोजगार मिळवण्यासाठी लायक बनवणारे प्रशिक्षण., तसेच स्त्रियांना आत्मविश्वास निर्माण करणारे शिक्षण दिले जावे याचा आग्रह धरला. अर्थातच याचे फलित दृश्यरुपात तरी आशादायक आहे. तरीदेखील स्त्रिया आपल्या पात्रतेने उच्च शिक्षण, आर्थिक सुबत्ता मिळवणाऱ्या असूनही आपल्या अस्तित्वाबद्दल भौतिकपणे स्वार्थी बनलेल्या आहेत. परंतू आपल्या मानसिक गुलामगिरीला आणि बौध्दिक विचारशक्तीहीनतेविषयी सजग नाहीत हे स्त्री–चळवळींचे शल्य आहे.

## बलात्कार –

बलात्कारा विरुध्दची चळवळ राष्ट्रव्यापी स्त्री संघटनांनी महत्वाची चळवळ मानली. कुटुंब पातळीवर होणाऱ्या बलात्काराचा उच्चार महात्मा फुले यांनी निर्भीडपणे केला. आपल्या ' सार्वजनिक सत्यधर्म' पुस्तकात ते म्हणतात, " पवित्रतेचा पोकळ आव आणणारे अतिनिर्लज्ज आर्य आपल्यातील अबला व पंगू भावजया व सुना तारुण्याच्या भरात आल्याबरोबर त्यांचा रात्रंदिवस इतका पाठलाग करतात, की त्यांची पावले सहजच आडमार्गी पडतात व त्यांना अब्रूकरता नाइलाजाने गर्भपात करुन बालहत्या करावी लागते. आणि याचे कारण देखील जोतिराव पुढे स्पष्ट करतात, जे अतिशय महत्वाचे असून स्त्री–मुक्तीचे गमक आहे. ते म्हणतात, " स्त्रीजातीस नीच मानण्याचा प्रघात पडल्यामुळे आणि त्यास अनेक धूर्त व कावेबाज ऋषींनी केलेल्या संहिता, स्मृती वगैरे यांचा बळकट आधार मिळाल्यामुळे आजपावेतो ही दुष्ट चाल चालू ठेवली आहे. स्त्री नीच आहे, उपभोगाची वस्तु आहे असे समर्थन धर्मग्रंथानी केल्यामुळे बलात्कारदेखील पुरुषांनी करण्याची सहज गोष्ट ठरली. त्यातुनच स्त्रीचा जीव जाऊ शकतो. दुसराही जीव जाऊ शकतो. परंतू धर्मसंहिता मानववधाचे हे पातक प्रायश्चिताच्या मार्गाने निवारता येते असे सांगतात. फुले काळात स्त्री कुटुंबातून बाहेर पडलेली नव्हती. त्यामुळे बलात्काराची प्रवृत्ती कुटुंबापर्यंत मर्यादित होती. परंतू जेव्हा स्त्री घराबाहेर पडू लागली तेव्हा ही प्रवृत्ती सामाजिक स्वरुपात दिसू लागली. मजुरीला जाणाऱ्या स्त्रिया, जातीय दंगलीत सापडलेल्या स्त्रिया, शासक–कर्मचारी वर्गाच्या तावडीत सापडलेल्या स्त्रिया, गुंडाच्या दहशतीत सापडलेल्या स्त्रिया यांच्यावरील बलात्कार व त्या बलात्काराच्या गुन्हयांना शिक्षा न देणारी न्यायव्यवस्था, दोघेही स्त्री–चळवळीच्या आक्रमक माऱ्याचे लक्ष्य ठरले. मथुरा नावाच्या अल्पवयीन आदिवासी स्त्रीवर पोलिस ठाण्यात पोलीसांकडून झालेल्या बलात्काऱ्याला सर्वोच्च न्यायालयाने न दिलेली शिक्षा कायद्याच्या त्रुटीमुळे आहे. यासाठी कायद्याची दुरुस्ती करावी लागली. परंतू भारतीय न्यायसंस्थेच्या इतिहासात पूनर्विचारार्थ ही केस पुन्हा दाखल झाली ते स्त्रियांच्या चळवळीचे देशभर केलेला आक्रमक उठाव यामुळे घडले. स्त्री म्हणून तिला नीच मानल्यावर प्रस्थापित समाजव्यवस्थेत तिचे स्थान नगण्यच मानले गेले. त्यामुळे येणारी उपेक्षा व अपमान हे सद्वर्तनाचे विशेष ठरु लागले. त्यातुनच विधवा स्त्रियांचे प्रश्न, विधवांचे केशवपन, त्याविरुध्द महात्मा फुले यांनी पुण्यातील न्हाव्यांचा घडवून आणलेला संप ही एक आक्रमक व विधायक स्वरुपाची गोष्ट होती. परित्यक्तांचा प्रश्न ' शेतकऱ्याचा आसूड ' या पुस्तकात चर्चेला आणला आहे. कित्येक उनाड शेतकऱ्यांचे छाकटया मुलांनी आपल्या निरपराधी स्त्रियांचा त्याग केल्यामुळे त्या बापुड्या आपल्या आई बापाच्या घरी आयुष्याचे दिवस काढतात, तर निराश्रित मुलींना यमसदनास जाण्याची वेळ येते. अलिकडील चार–पाच वर्षात महाराष्ट्रभर घेतलेल्या परित्यक्ता संमेलनात परित्यक्तता या अधिकाधिक बहुजन समाजातील आहेत आणि फुले यांनी चित्रित केल्याप्रमाणेच त्यांच्या समस्या अधिक जीवघेण्या आहेत. स्त्री–संघटना मुस्लिम स्त्रियांची तलाकपीडा बंधुभावाच्या तत्वावर सोडवण्याचा प्रयत्न करताना दिसत असल्या तरी शहाबानू प्रकरणामुळे संपूर्ण भारतभर समान नागरी कायद्याचा आग्रह स्त्रियांनी धरला होता. त्या आक्रमकही झाल्या होत्या. परंतू दुर्दैवी शासनसंस्थेने हा आग्रह हाणून पाडला.

## हुंडा व हुंडाबळी प्रकरण –

विवाहातील अनेकविध शोषणापैकी एक प्रकार महात्मा फुले यांनी आपली विवाहपध्दतीच बदलून टाकली. हे भौतिक स्वरुपाचे कार्य., यावर स्त्री–संघटना कमी भर देतात. महात्मा फुले यांनी यशवंतचा केलेला विवाह हा देखील क्रांतिमूलक वैशिष्टयाचा

भाग आहे. लग्नात बघितली जाणारी जातकुळी त्यांनी हाणून पाडली. हा पहिला आंतरजातीय विवाह होय. त्यांनी विधवांच्या पुनर्विवाहावर भर दिला. सावित्रीबाईंनी महार आणि ब्राह्मण (महार स्त्री व ब्राह्मण पुरुष) यांच्या प्रेमसंबंधाची कथा फुले यांनी पत्रात लिहून पाठविलेली आहे.ज्यामुळे त्यांचे माहेरचे गाव संपूर्णपणे बिथरले होते. (डॉ. माळी यांच्या पुस्तकावरुन). आजही आंतरजातीय विवाहाच्या चळवळी स्त्रियांनी म्हणाव्या तितक्या हाताशी घेतलेल्या नाहीत. बाला-जरठ विवाहाचा विरोध त्यांनी आपल्या 'सार्वजनिक सत्यधर्म' पुस्तकात केलेला आहे. आजही भारताच्या नव्हेतर महाराष्ट्रातील अनेक भटक्या जमातीत व ग्रामीण भागात बालविवाहाची प्रथा अस्तित्वात आहे, ज्यावर स्त्रियांची दोन्ही पध्दतीने-विधायक आणि आक्रमक-आंदोलने होतच असतात. याच कुटुंबपध्दतीतील एकादोषाने स्त्रियांना सतत अपराधी केलेले असते, ते म्हणजे कुमारी मातृत्व. फुले यांच्या काळात हे विधवा मातृत्व होते. त्यासाठी त्यांनी बालहत्या प्रतिबंधगृह व अनाथालयाची स्थापना केली होती. आजही अनेक स्त्री-संघटना विधायक पध्दतीने अनाथ मुलांचा प्रश्न सोडवण्यासाठी कार्यतत्पर झालेल्या आहेत. परंतू मुळात प्रश्न, फुले यांनी ज्यांचा विचार केला, पुरुषसत्ताक-पितृसत्ताक-संस्कृतीचा, ज्यामुळे सर्व करणारी स्त्री ही अपराधी ठरते. तो अजुनही अनुत्तरीत आहे ना? कोठे कोठे पाश्चात्य स्त्रियांच्या अनुकरणामुळे इच्छित पालकत्वाचा पर्याय स्वीकारलेला आहे. परंतू अशी उदाहरणे भारतात विरळा आढळतात.

१. स्त्रीजन्माचा धिक्कार-तिरस्कार. यामुळे गर्भजपरीक्षेतून स्त्रियांचे हनन. भारतीय काही भागांत स्त्री अर्भकांना जन्मानंतर मारुन टाकणे.
२. १८२९ साली सतीबंदीचा कायदा होऊनही रुपकुंवरसारख्या स्त्रीला सतीचे निमित्त करुन जाळून टाकणे. राजस्थानात प्रचलित असलेली सतीप्रथा.
३. सांस्कृतिक क्षेत्रातील प्रसारमाध्यमातून होणारे स्त्रीदेहाचे विकृत चित्रण. सौंदर्य स्पर्धाचे आयोजन. ललित साहित्यातून उमटणारे स्त्रीचे चित्रण. स्त्रीच्या शारीरिक व मानसिक गुलामगिरीचे चिन्ह असूनही कळत्या स्त्रियांकडून अर्थलिप्सेने व कीर्तीच्या नादाने ही गुलामगिरी स्वीकारली जाते आहे.
४. आर्थिक क्षेत्रात स्पर्धा, नोकरी, व्यवसाय इत्यादीत स्त्रीचे स्त्रीत्वामुळे केले जाणारे शोषण हा चिंतेचा विषय होय.
५. धार्मिक क्षेत्रातील कार्यक्रमात स्त्रियांची वाढती प्रवृत्ती, बुवाबाजीचे स्तोम, बाबागिरीच्या बळी पडलेल्या स्त्रिया, जादुटोणा, भूतबाधा, जोतिषभविष्य (ज्यावर महात्मा फुले यांनी आपल्या लेखनातून टीकेची झोड उठवलेली आहे) इत्यादींवर अंधश्रध्देने विश्वास ठेवणाऱ्या स्त्रिया कशा बदलतील यावर विचार केला जात आहे.

अशा रीतीने, आजच्या महाराष्ट्रातील स्त्रियांच्या चळवळींसमोर अनेक अव्हाने आहेत, ज्या आव्हानांना महात्मा फुले व त्यांच्या पत्नीने धडक दिली होती. त्याच संदर्भातील प्रश्नांना अनेक संघटना तोंड देताना दिसतात. काही ठिकाणी यश येते, काही ठिकाणी अपयश, तर काही ठिकाणी कालानंतर यशाची जाणीव होते. स्त्रियांच्या कार्याचे क्षेत्रही विस्तारित झालेले आहे. कुटुंब व समाजाच्या जाचात सापडलेल्या स्त्रियांना कायदेशीर मदत करणे, त्यांच्यासाठी आधारकेंद्र निर्मिती, स्त्रियांच्या अनेक प्रश्नांवर संशोधनात्मक लिखाण, विद्यापीठांना स्त्री-अभ्यासावर केंद्रित केलेले लक्ष, स्त्रियांच्या प्रश्नांवर लेखन करणाऱ्या स्त्रियांना चळवळींची माध्यमे म्हणून चालवलेली ' बायजा ', ' स्त्री ', ' ललकारी ', ' मिळून साऱ्याजणी ' इत्यादी नियतकलिके, प्राध्यापिका इत्यादी यासारख्या व्यावसायिक स्त्रियांनी व्यवसायावर चालवलेले लेखन चळवळीची दिशा ठरवणारे आहे.

स्त्रियांच्या आरोग्याचा पश्न स्त्री-संघटनांच्या चिंतेला अधिकाधिक वृद्गिंगत करु लागलेला आहे. आधीच स्त्री संघटनांना संकटात टाकणारा वेश्या व्यवसायाचा प्रश्न एड्स या नव्या रोगामुळे गहन बनलेला आहे. स्त्री संघटना आरोग्यासंबंधी शासनावर जास्तीत जास्त अवलंबून असतात. परंतू शासनाच्या मर्यादा व त्यांचे शिथिल धोरण लक्षात घेऊन, स्वयंसेवी संघटनांनी जाणीवजागृतीची शिबिरे आयोजित करुन स्त्रियांना जागवण्याचा प्रयत्न केला. याच जोरावर उभी आहे देवदासींची चळवळ. मूळ प्रेरणा धर्माची परंतू विस्तृत कार्यभार वेश्या व्यवसायाचा. स्त्री चळवळींना दोन्ही मुद्यांवर आक्रमक व विधायक पध्दतीने लढावे लागते.

महाराष्ट्रातील स्त्री चळवळीपुढे अनेक प्रश्न उभे आहेत. जुन्या मूल्यव्यवस्थेचे व नवीन भौतिकताप्रधान अस्थिर संस्कृतीचे, परंतू स्त्री चळवळी आजही महात्मा फुले यांचे हक्कवादी सूत्र घेऊनच पुढे चाललेल्या आहेत हे निर्विवाद होय. स्त्री-पुरुष समतेचे, मानवी हक्काचे मूल्य आधाराला घेऊन नव्या रस्त्यांची वाटचाल होत आहे. अन्यायमूलक बंधनांना कशाही प्रकारे चिरडून टाकू हा आक्रमक आत्मविश्वास स्त्रियांनी प्राप्त केला. संघटनेच्या रुपात एकट्या सावित्रीबाईंनी किंवा महात्मा फुले यांनी हा पवित्रा निर्मेळपणे घेतलेला होता. सर्व स्तरांवर दलित, आदिवासी, बहुजन, मुस्लिम, कामगार इत्यादी चळवळींमधून माणूस म्हणून हक्कापर्यंत पोहोचणे हे स्त्रीसंघटनांचे उद्दिष्ट दिसते. स्त्रीसंघटनांचे जाळे देशभर पसरवणे, ग्रामीण पातळीवर व शहरी पातळीवर तळागाळात कार्यकर्ता वर्ग

निर्माण करणे व आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्त्री संघटनांशी समान मानवी हक्क–मूल्यांसाठी संपर्क साधणे ही आजची कार्यपध्दत फुले यांच्या कार्यपध्दतीला अनुसरुन आहे. फरक इतकाच, की फुले यांना त्यांच्या ह्यातीत देशभर एवढा प्रतिसाद नव्हता. परंतू त्यांची चळवळ गावोगाव पोचली होती. फुले मार्गाने गावोगाव चळवळ चुलीपर्यंत पोचवणे स्त्री चळवळींना करावयाचे आहे. महात्मा फुले यांना आंतरराष्ट्रीय संपर्क काल, सत्ता व देशाच्या मर्यादेमुळे व वाहन अभाव, संपर्क माध्यमांचा अभाव यामुळे तितकासा साधलेला नसूनही त्यांचे कार्य मौलिक आहे. मौलिक कार्याच्या आधामुळे महात्मा फुले महान व स्त्रीमुक्तीचे अग्रणी आहेत. स्त्रियांना मानवी हक्क देणारे ते एक महान धर्मसंस्थापक आहेत. कोणत्याच धर्मसंस्थापकाने स्त्रीचा इतका विचार केलेला दिसत नाही, जितका महात्मा फुले यांनी आपल्या 'सार्वजनिक धर्म' पुस्तकात केलेला आहे. स्त्रीमुक्तीच्या या उद्गात्याला इतिहासाच्या अंतापर्यंत स्त्रिया विसरणार नाहीत. जर स्त्रियांचे जाती, धर्म, गुलामगिरीचे अनुबंध गळून पडले तर...

## संदर्भ ग्रंथ


१. स्त्री आणि पुरुष, सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक, महात्मा फुले समग्र वाड्.मय, पृष्ठ ३५९
२. तत्रैव, पृष्ठ ४११
३. तत्रैव, पृष्ठ ३६१
४. तत्रैव
५. तत्रैव
६. शेतकऱ्यांचा आसूड, महात्मा फुले समग्र वाड्.मय, पृष्ठ २५२
७. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, पृष्ठ ७६
८. सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक, महात्मा फुले समग्र वाड्.मय पृष्ठ ३६१
९. बायजा, फुले–आंबेडकर विशेषांक, नोव्हेंबर–डिसेंबर १९९०
१०. बायजा,मे–जुन १९९१
११. जोतिबा फुले आणि स्त्रीमुक्तीचा विचार डॉ. गेल ऑमवेट